# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक
अत्यंत महत्त्वाचे

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१५/१२९६

दिनांक : 29 APR 2015

प्रति,
संचालक /प्राचार्य
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदवी /औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती करण्याबाबत...........

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी/वाटप/२०१५/५ व ६, दि. १८/०४/२०१५
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१४/११७८, दि. ०९/०४/२०१५

सर्व खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी आर्थिक मागास प्राप्त लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरलेले असतील अशा विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न/लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना तात्काळ सूचित करण्यांत यावे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही आधारकार्ड नोंदणी केलेली नसेल अशा विद्यार्थ्यांकरिता आपल्या संस्थेने आपल्या विभागातील संबंधीत एजंन्सीशी संपर्क साधावा. व संबंधीत एजन्सीचा कँप आपल्या संस्थेत नियुक्त करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर पूर्ण करावी. आर्थिकदृष्ट्या मागास असलेला एकही विद्यार्थी त्यापासून वंचित राहणार नाही. याची संबंधीत संस्थेने व्यक्तीशः काळजी घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिक मागास पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच आधार कार्ड क्रमांक संलग्न केलेले त्यांचे बँक खाते क्रमांकाबाबतची माहिती संचालनालयाच्या www.dtemaharashtra.org.in या संकेतस्थळावरील EBC Scholarship प्रणाली मध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना संस्थांनी सूचित करावे. जेणेकरुन शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करणेबाबतची कार्यवाही करणे सुलभ होईल.

या कार्यालयाचे संदर्भीय क्र.२च्या परिपत्रकान्वये वरील सूचना या आधीच देण्यांत आलेल्या आहेत. तथापि मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची संदर्भीय क्र.१ येथील परिपत्रके संस्थांच्या माहितीकरिता सोबत जोडून पाठविण्यांत येत आहेत.

**संस्थांसाठी सूचना :-**

सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून ईबीसीचे वाटप करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता व मानक निश्चित करुन वाटप होणार असल्याने सर्व संस्थांनी ईबीसीच्या संगणक प्रणालीवरील पुढील लिंकवर विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद करणे अनिवार्य आहे. (Home – Update Aadhaar, Bank and Last Year Result Details) संस्थांना याबाबत सूचित करण्यांत येते की, ज्या संस्थांमधील विद्यार्थ्यांचे मार्क्स ग्रेडेशन पध्दतीने दिले जातात, अशा विद्यार्थ्यांचे ग्रेडेशन त्यांच्या मार्क्समध्ये रुपांतरीत (Covnert) करुन विद्यार्थ्यांचे मार्क्स नोंदविण्यांत यावेत.

...२.

**<u>विद्यार्थ्यांसाठी सूचना :-</u>**

तसेच संस्था स्तरावर विद्यार्थ्यांना सूचित करण्यांत यावे की, विद्यार्थ्यांनी त्यांच्या ॲप्लीकेशन आयडी व पासवर्ड द्वारे त्यांचा आधारकार्ड क्र. व बँक खात्याचा सर्व तपशिल म्हणजेच बँक खात्यावर त्याचे असलेले नाव, त्याचा खाते क्र., मायकर क्रमांक, आयएफएससी क्रमांक, बँकेचे नाव व शाखा **<u>इत्यादी तपशिल विद्यार्थ्याने अचूक भरणे आवश्यक आहे.</u>** ह्या तपशिलातील कोणतीही माहिती चूकीची असल्यास विद्यार्थ्याच्या खात्यावर ईबीसीची रक्कम थेट इसीएसद्वारे जमा होणार नाही. असे विद्यार्थ्यांना संस्था स्तरावर सूचित करण्यांत यावे. त्यामुळे विद्यार्थ्याने सदरचा तपशिल भरल्यानंतर सर्व माहिती एकदा बरोबर आहे की नाही ? याची खात्री करुनच Submit बटणवर Click करावे.

विद्यार्थ्यांनी त्यांचे बँक खाते आधारकार्डसोबत लिंक केले आहे की नाही ? याकरिता संस्थांनी विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे फॉर्म देऊन त्यांच्या बँकेकडून आधारकार्ड लिंक झाले असल्याबाबत प्रमाणित करुन घ्यावे. ह्याकरिता विद्यार्थ्यांना निश्चित कालावधी द्यावा. तद्नंतर विद्यार्थ्यांकडून प्रमाणित केलेले फॉर्म्स विद्यार्थ्यांकडून प्राप्त होताच. त्यानुषंगाने खालील तक्त्यात त्याची माहिती भरुन उशिरात उशिरा दि. १५/०५/२०१५ पर्यंत ह्या कार्यालयाकडे सादर करावे. ज्या विद्यार्थ्यांनी आधार कार्डसाठी नुकतीच नोंदणी केली असेल असे विद्यार्थी जो पर्यंत त्यांचे आधारकार्ड त्यांना प्राप्त होणार नाही. तोपर्यंत प्रलंबित राहतील. मात्र दि. १५/०५/२०१५च्या आधी जे विद्यार्थी आधारकार्ड बँकेशी लिंक करुन संस्थेने त्यांना दिलेला विहीत फॉर्म सादर करतील अशा विद्यार्थ्यांचा तपशिल दि. १५/०५/२०१५ पर्यंत विनाविलंब ह्या कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य आहे.

## <u>संस्थेने विद्यार्थ्यांचा द्यावयाचा तपशिल</u>

प्रमाणित करण्यांत येते की, खालील तक्त्यात नमूद केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे आधारकार्ड क्र. त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेले आहे. त्याबाबतचा पुरावा संस्थेने विद्यार्थ्यांकडून घेऊन संस्थेकडे जतन करुन ठेवलेला आहे.

| Sr. No. | Name of Student | Admission Year | Aadhaar Card No. | Name of Bank | Bank Account No. | IFSC No. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**<u>संस्थेने विद्यार्थ्यांकडून खालील प्रमाणे फॉर्म घेऊन त्या आधारे वरील तक्ता अद्ययावत करुन सादर करणे अनिवार्य आहे.</u>**

<u>Proforma for Aadhaar Link Bank Account</u>

1. **<u>Education Details</u>**
   Name of the Student ..........................................................................
   Class ......................... Branch ...................... Academic Year..........................
2. **<u>Aadhaar No.</u>** ..................................................
3. **<u>Bank Details</u>**
   Name of the Bank ..........................................................................
   Address of the Bank..........................................................................
   Branch.......................................... Account No.....................................
   IFSC No. ........................................ MICR No. .......................................

Note : Attached Aadhar Card &
Bank Pass Book Xerox

Student Singature

This is to certify that above mentioned Bank Account is verified and linked with above mentioned Aadhaar No.

Branch Manager
Sign & Seal of Bank

सर्व संस्थांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यांत येते की, त्यांनी वरील कार्यवाही दिलेल्या मुदतीत पूर्ण करुन सर्व तपशिल विहीत कालावधीत ह्या कार्यालयाकडे सादर करावा. विद्यार्थ्यांचे गुण अद्यायावत करण्याकरिता आवश्यकताल वाटल्यास संस्था स्तरावर तज्ज्ञ समिती गठीत करुन त्यानुसार विद्यार्थ्यांचे गुण ईबीसी प्रणालीवर नोंद करावी. त्याच त्याच कारणाकरिता वारंवार ह्या कार्यालयाकडे दूरध्वनीवरुन संपर्क साधण्याची आवश्यकता नाही.

असे निदर्शनास आले आहे की, ह्या कार्यालयाकडून निर्गमित होणारी परिपत्रके पूर्णपणे न वाचता संस्था स्तरावर कार्यवाही करण्यांत येते. त्याकरिता सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्यानुसार आवश्यक असलेली कार्यवाही करावी. तसेच ह्या कार्यालयास कोणतीही माहिती सादर करताना ती A4 साईज आकाराच्या कागदावरच सादर करावी.

(प्रमोद अ. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक:१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/०६

दिनांक : 18 APR 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/
अमरावती/नागपूर.

**विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत...**

संदर्भ :-१.या संचालनालयाचे पत्र क्र.१०/एनजीपी/आधारकार्ड/२०१४/५,दि. ८ जाने. २०१५.
२. या संचालनालयाचे पत्र क्र.१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४१५/२२३, दि.१३ मार्च २०१५.
३.या संचालनलाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/२३३,दि.२३मार्च २०१५.
४.या संचालनालयाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक।२०१४-१५/२३५,दि.२४मार्च२०१५.
५.या संचालनालयाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी-परिपत्रक।२०१४-१५/२४६,दि.४एप्रिल२०१५.

खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या अर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न/लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना सुचित करण्याबाबत संबंधित संस्थाना आपल्या स्तरावरुन कळविण्याच्या सुचना संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये आपणास दिलेल्या आहेत.तसेच संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे सुलभ व्हावे याकरीता संस्थास्तरावर कँप आयोजीत करणेबाबत संबंधित Agency शी समन्वय साधणेसाठी संस्थाना सुचना देण्याबाबत संदर्भ क्र.४ व ५ च्या पत्रान्वये निर्देशित केले आहे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई-४००
आवक क्रमांक : 2970
दिनांक 21 APR 2015

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील अर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक तसेच आधार कार्ड क्रमांक संलग्न केलेले त्यांची कोअर बँकीगची सुविधा असलेले बँक खाते क्रमांक याची माहिती संचालनालयाच्या dtemaharashtra.org.in या संकेतस्थळावरील EBC Scholarship प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना संस्थांनी सुचित करणेबाबत आपल्यास्तरावरुन सुचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापावेतो विद्यार्थ्यांनी त्यांचे आधारकार्ड क्रमांक तसेच बँक खात्याच्या तपशिलाची माहिती संगणक प्रणालीवर भरलेले नाही असे दिसून येते. ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते व आधारकार्ड क्रमांक अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता संस्थांनी संबंधित एजन्सिला संपर्क साधून संस्थेमध्ये कँप आयोजित करावा. किंवा विद्यार्थ्यांनी संबंधित एजन्सिकडून आधारकार्ड उपलब्ध करुन घ्यावे.याबाबत संस्थांनी विद्यार्थ्यांना सूचना देण्याबाबत कळविण्यात यावे.

आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न केलेली अद्ययावत माहिती **दिनांक १५ मे २०१५ पर्यंत** प्रणालीवर नोंदविणेबाबत कळवावे. विद्यार्थ्यांच्या बँक तपशिलाची माहिती संस्थाप्रमुखांनी प्रमाणित करुन आपल्या कार्यालयाकडे **दिनांक २० मे २०१५ पर्यंत** जमा करण्याबाबत सूचना द्याव्यात. उपरोक्त सर्व माहिती आपल्या स्तरावर **दिनांक ३१ मे २०१५ पर्यंत** अद्ययावत ठेवावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करणे सुलभ होईल.

**( डॉ. सुभाष महाजन )**
**संचालक ,**
**तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत :- १. प्रणाली विश्लेषक तथा समन्वयक तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई. यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

२. व्यवस्थापक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

३. संबंधित सर्व संस्था.